CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## धाराशिवमध्ये राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

शहरातील श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला.

यावेळी जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी भारत देवगुडे, प्राचार्य तथा मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे व इयत्ता ५ वी पर्यवेक्षक शेषनाथ वाघ यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना नंदकुमार नन्नवरे यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक, सामाजिक, कुस्ती व व्यवसायिक क्षेत्रातील कार्याचा गौरव केला. त्यांच्या कार्यामुळे कोल्हापूरचे नाव जागतिक पातळीवर पोहोचल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी कलाशिक्षक शिवाजी भोसले, सहशिक्षक हुकुमचंद कानडे, संतोष देशमुख, ए.सी. पवार, देवकन्या कांबळे, रमेश जगताप, नवनाथ तांबारे, अजित जगताप, सुहास वाघमारे, उमेश गायकवाड, भाग्यश्री पवार व बापू आदमाने उपस्थित होते.

# जलजीवन योजनेच्या कामात अडथळा; अधिकाऱ्याला शिवीगाळ

### चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

जलजीवन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पाईपलाईन कामात अडथळा निर्माण करून ग्रामपंचायत अधिकाऱ्याला शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संतोष किसन शेंबडे, केलास किसन शेंबडे, योगेश चंद्रकांत शेंबडे आणि बालाजी भास्कर देवकते, सर्व रा. साडेसांगवी, ता. भूम, जि. धाराशिव यांनी दि. ४ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास बाणगंगा नदीपात्रातील सरकारी कामात अडथळा आणल्याचा आरोप आहे. फिर्यादी शशिकांत गजेंद्र पवार (वय ४२, व्यवसाय-ग्रामपंचायत अधिकारी, साडेसांगवी, ता. भूम, रा. रामकृष्ण कॉलनी, धाराशिव) हे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसह साडेसांगवी येथील बाणगंगा नदीपात्रातील विहिरीवरील मोटार सुरू करण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपींनी विहिरीवरील शासकीय मोटार सुरू करू दिली नाही.

तसेच जलजीवन योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या सुमारे ९० मीटर पाईपलाईनचे काम अडवून ठेवले. याबाबत विचारणा करण्यासाठी गेल्यानंतर आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून तू कसे काम करतो आणि गावाला पाणी कसे देतो तेच बघतो, अशी धमकी दिली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# नळदुर्गच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम संथगतीने

### माहिती फलक उभारण्यासह ठेकेदारावर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ मे -**

नळदुर्ग शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम अतिशय संथगतीने सुरू असून कामाचा हाच वेग कायम राहिला तर हे काम पूर्ण होण्यासाठी आणखी दीड ते दोन वर्षांचा कालावधी लागू शकतो, अशी भीती शहरवासीयांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जनतेने निवडून दिलेल्या नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवकांनी संबंधित ठेकेदाराकडून काम जलदगतीने पूर्ण करून घ्यावे, अशी मागणी होत आहे. तसेच पाणीपुरवठा योजनेच्या कामासंदर्भातील माहितीचे फलक चावडी चौक, किल्ला गेट आणि बसस्थानक परिसरात उभारावेत, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे.



आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाने नळदुर्ग शहरासाठी तब्बल ४६ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे. या योजनेमुळे शहरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल, अशी अपेक्षा नागरिकांना होती. मात्र या कामाची जबाबदारी असलेल्या सुजाता कन्स्ट्रक्शन कंपनीकडून काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

नगरपालिकेकडून वारंवार मुदतवाढ देण्यात आल्याने ठेकेदाराचे लाड होत असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. प्रशासकीय काळात सुरू झालेले हे काम आजही अपूर्णच असून नगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांनी यामध्ये लक्ष घालून दर्जेदार आणि वेळेत काम पूर्ण करून घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

नागरिकांच्या मते, पुढील किमान ३० वर्षे या योजनेसाठी पुन्हा शासनाकडून निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सध्या सुरू असलेले काम अत्यंत दर्जेदार आणि नियोजनबद्ध होणे आवश्यक आहे. कामात निष्काळजीपणा किंवा निकृष्ट दर्जा राहिल्यास त्याचे गंभीर परिणाम शहरातील ३० ते ३५ हजार नागरिकांना भोगावे लागू शकतात.

सध्या शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बोरी धरणात मुबलक पाणी उपलब्ध असतानाही नगरपालिकेची यंत्रणा सक्षम नसल्यामुळे नळदुर्गमध्ये आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याची परिस्थिती आहे. या हालअपेष्टा लक्षात घेऊनच आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी ४६ कोटी रुपयांची योजना मंजूर करून आणली होती. मात्र ठेकेदाराच्या संथ कामकाजामुळे अद्यापही नागरिकांना नियमित पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा करावी लागत आहे.

दरम्यान, शहरात सुरू असलेल्या पाण्याच्या टाक्या, जलवाहिन्या आणि जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या कामांबाबत नागरिकांना कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याची तक्रार आहे. संबंधित ठेकेदाराने काम सुरू होण्यापूर्वीच माहिती फलक उभारणे अपेक्षित होते; मात्र आजपर्यंत शहरात कुठेही असे फलक दिसत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सध्या टाकण्यात येणारी जलवाहिनी कोणत्या कंपनीची आहे, तिचा व्यास किती आहे, काम अंदाजपत्रकानुसार सुरू आहे का, याबाबत माहिती मिळण्याचा कोणताही मार्ग नसल्याने माहिती फलक तातडीने उभारावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

नगरपालिकेने यापुढेही ठेकेदाराला मुदतवाढ देत बसू नये. मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित कंपनीला माहिती फलक उभारण्याचे आदेश द्यावेत. तसेच पुन्हा मुदतवाढ देऊनही काम वेळेत पूर्ण न झाल्यास संबंधित कंपनीवर दंडात्मक कारवाई करून टेंडर रद्द करावे, अशी मागणी शहरवासीयांतून होत आहे.

## विवाहितेच्या आत्महत्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

बाली मच्छिंद्र शिंदे (रा. इंदिरा पारधी पिढी पारा, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी दि. २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली होती. या प्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपींमध्ये मच्छिंद्र शहाजी शिंदे (पती), महादेव शहाजी शिंदे (दिर), पिंकी महादेव शिंदे (भावजय), शहाजी भिमा शिंदे (सासरे) आणि मानुबाई शहाजी शिंदे (सासू), सर्व रा. इंदिरा पारधी पिढी पारा, ता. वाशी, जि. धाराशिव यांचा समावेश आहे.

फिर्यादी धनंजय रामचंद्र काळे (वय ४२, रा. ब्रम्हनाथ पारधी पिढी, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी दि.६ मे रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी वारंवार मयत बाली हिच्या चारित्र्यावर संशय घेत शिवीगाळ व मारहाण करत होते. या सततच्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून बाली हिने आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## रिक्षाच्या डिक्कीतून ३५ हजारांची रोकड चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

धाराशिव शहरातील धारासुर देवी मंदिरासमोर उभ्या असलेल्या रिक्षाच्या डिक्कीतून ३५ हजार रुपयांची रोकड चोरी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी विठ्ठल मच्छिंद्र विधाते (वय ५६, रा. धारासुर देवी मंदिरासमोर, धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. ५ मे २०२६ रोजी दुपारी २.३० ते ३ वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या रिक्षाच्या डिक्कीत ठेवलेली ३५ हजार रुपयांची रोकड अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. ही घटना धारासुर देवी मंदिरासमोर घडली असून फिर्यादीने दि.६ मे २०२६ रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## वाशी येथे आज महसूल समाधान शिबिर

### नागरिकांनी लाभ घ्यावा; तहसीलदारांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ मे -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथे महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानांतर्गत दि. ८ मे रोजी भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील अन्नपूर्णा मंगल कार्यालय येथे हे शिबिर पार पडणार असून नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

या शिबिरामध्ये महसूल व पुरवठा विभागाशी संबंधित विविध सेवा देण्यात येणार असून शासनाच्या योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचविणे हा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमात नगरपंचायत वाशी, आरोग्य विभाग, भूमी अभिलेख, दुय्यम निबंधक कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, एकात्मिक बालविकास प्रकल्प, स्टेट बँक ऑफ इंडिया तसेच पोस्ट कार्यालय आदी विभागांचा सहभाग राहणार आहे. त्यामुळे नागरिकांना विविध कामांसाठी वेगवेगळ्या कार्यालयांत जाण्याची गरज भासणार नाही.

वाशी मंडळातील वाशी, कवडेवाडी, केळेवाडी, तांदुळवाडी, महालदारपुरी, सरमकुंडी, यशवंडी, गोलेगाव, कन्हेरी, पार्डी, इंदापूर, खानापूर, इसरूप व बोरी येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकाश म्हेत्रे यांनी केले आहे.

## अणदूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; परिश्रमानेच यश मिळते : रामचंद्र आलुरे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

शिक्षण प्रसारक मंडळ, जवाहर परिवार अणदूर यांच्या वतीने आज (दि. ६ मे) रोजी जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी (विज्ञान, कला, वाणिज्य व किमान कौशल्य शाखा) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहात करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या भक्ती नरवडे, पंडित हांडगे, रेणुका व्हन्ड्रे, तस्लीम पिंजारी, अंकिता जाधव, श्रावणी हब्बू, प्रतिज्ञा मंडोळकर, मयुरी शिरगिरे, कादंबरी सुतार, शंभू दळवे, शुभम शिंदे, फिरदोस शेख, सना पठाण, वेदांत बिराजदार, श्रावणी पंचधारे या विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी रामचंद्र आलुरे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण संदेश दिला. मिळालेल्या यशाने हुरळून जाऊ नका. यश टिकवण्यासाठी अधिक परिश्रम आवश्यक आहेत. स्पर्धा वाढत चालली असून कमी गुण मिळाले म्हणून खचून जाऊ नका. गुण म्हणजे सर्वस्व नाही. पुढील काळात आपले क्षेत्र निश्चित करून सातत्याने अभ्यास करा. आई-वडिलांचे कष्ट लक्षात ठेवा आणि प्रत्येक संकटावर मात करत पुढे वाटचाल करा, असे ते म्हणाले.

कार्यक्रमास गोपाळ कुलकर्णी, पालक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रोहित मोरे यांनी मानले.

## जुन्या कोर्ट परिसरातून केबल व बॅटरी चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

तुळजापूर येथील जुन्या कोर्ट परिसरातून लाईट फिटिंगची केबल आणि जनरेटरची बॅटरी चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.५ मे रोजी जुने कोर्ट, तुळजापूर येथील लाईट फिटिंगसाठी वापरण्यात येणारी सुमारे २ हजार रुपये किमतीची केबल तसेच किर्लोस्कर जनरेटरसाठी लावलेली १२ व्होल्टची ३ हजार रुपये किमतीची बॅटरी असा एकूण ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला. या प्रकरणी आब्बास शम्मु नदाफ (रा. पापनाश नगर, तुळजापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मेघराज तानाजी सावंत (वय ४५, व्यवसाय-नोकरी, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तुळजापूर, रा. घाटशिळ रोड, दीपक चौक, तुळजापूर) गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## धाराशिवमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) अल्पसंख्याक विभागाची आढावा बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) धाराशिव जिल्हा अल्पसंख्याक विभागाची आढावा बैठक आज जिल्हा कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संघटन बळकटीकरण, आगामी राजकीय रणनीती तसेच विभागीय कामकाजाचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

या बैठकीस निरीक्षक म्हणून जावेद खरेदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच जीवनराव गोरे, सक्षणा सलगर, डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील, तोफिक शेख यांच्या नेतृत्वाखाली बैठक पार पडली. अल्पसंख्याक विभागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सहभाग होता. बैठकीदरम्यान मसूद भाई शेख, कादरभाई खान, शेखर घोडके, मनीषा पाटील, बबलू शेख, प्रा. तुषार वाघमारे, डॉ. अविनाश तांबारे, ज्योती माळाळे, रमेश देशमुख, अहमद काजी, सुनील आंबेकर, पंकज भोसले, सर्फराज कुरेशी, नर्सिंग मेटकरी, इजाज काजी, प्रा. जालिंदर पोळ, सुरज वडवळे, ॲड. योगेश सोन्नेपाटील, ॲड. अविनाश जाधव, दत्ता राऊत, हेमंत भोरे, असिफ शेख, सुरज सुकळे, अनिल जाधव, सरफराज पटेल, उमेश शिरसाटे, मलंग शेख, बाबा मुजावर, ॲड. बाळासाहेब आव्हाड, किरण रोकडे, डॉ. सय्यद फाद, बाळासाहेब कसबे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत अल्पसंख्याक विभागाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी विविध उपाययोजना, कार्यकर्त्यांचे प्रबोधन तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची भूमिका यावर सखोल चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांनी पक्षाच्या धोरणांनुसार जनतेपर्यंत पोहोचण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीच्या शेवटी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानत पक्ष बळकटीसाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

## भूम तालुक्यातील अतिक्रमणे नियमित; गरजू कुटुंबांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.७ मे -**

भूम तालुक्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महसूल व वन विभागाने २५ मार्च रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून, या निर्णयामुळे तालुक्यातील अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.




शासनाच्या निर्णयानुसार, १ जानेवारी २०११ किंवा त्यापूर्वीपासून निवासी वापरासाठी असलेली अतिक्रमणे ठरावीक अटी व शर्तींवर नियमित करण्यात येणार आहेत.

ही सवलत केवळ निवासी वापरापुरती मर्यादित असून व्यावसायिक वापरासाठी असलेल्या अतिक्रमणांना कोणतीही सवलत देण्यात आलेली नाही.

२०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे, ग्रामीण व शहरी भागातील ५०० ते १५०० चौ. फुटांपर्यंतची घरे यामध्ये समाविष्ट आहेत. ५०० चौ. फुटांपर्यंतचे अतिक्रमण विनाशुल्क नियमित केले जाणार आहे, तर ५०० ते १५०० चौ. फुटांदरम्यानच्या जागेसाठी शासनाने निश्चित केलेले शुल्क आकारले जाणार आहे.

१ जानेवारी २०११ नंतरची अतिक्रमणे, दुकान, गाळे, गोदाम यांसारखा व्यावसायिक वापर, सार्वजनिक रस्ते, नाले, जलस्रोत, वनक्षेत्र, शासकीय आरक्षित जागा व धोकादायक क्षेत्रांवरील अतिक्रमणे नियमित केली जाणार नाहीत.

तसेच आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्जदार, एकापेक्षा अधिक अतिक्रमण असलेली कुटुंबे किंवा खोटी माहिती देणारे अर्जदारही अपात्र ठरणार आहेत. अतिक्रमण नियमित करण्यासाठी मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती तसेच इतर शासकीय कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

याशिवाय, एकाच कुटुंबाला राज्यात फक्त एकच अतिक्रमण नियमित करता येणार असून त्यासाठी शपथपत्र देणे आवश्यक आहे.

या निर्णयामुळे भूम तालुक्यातील अनेक कुटुंबांना कायमस्वरूपी निवासाचा हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून प्रशासनाकडून याची प्रभावी अंमलबजावणी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विंड वर्ल्ड कंपनीविरोधात शेतकरी आक्रमक

### थकीत देणी दिल्याशिवाय कामे सुरू करू देणार नाही...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ मे -**

धाराशिव जिल्ह्यात सध्या पवनचक्की प्रकल्पांची कामे मोठ्या प्रमाणात सुरू असून या प्रकल्पांच्या अनुषंगाने अनेक ठिकाणी वाद निर्माण होत आहेत. यापूर्वीही जिल्ह्यात पवनचक्की कंपन्यांविरोधात विविध घटना घडल्या होत्या. आता पुन्हा एकदा वाशी तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले असून विंड वर्ल्ड पवनचक्की कंपनीविरोधात संघर्ष उभा राहताना दिसत आहे.

मागील तब्बल तेरा वर्षांपासून बंद असलेली विंड वर्ल्ड कंपनी पुन्हा सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. कंपनीकडून छोट्या-मोठ्या दुरुस्तीची कामेही सुरू करण्यात आली होती. मात्र कंपनी बंद होताना अनेक शेतकऱ्यांचे जमिनीचे भाडे, स्थानिक युवकांच्या वाहनांचे भाडे तसेच इतर देणी प्रलंबित ठेवून कंपनीने येथून काढता पाय घेतल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते.

सध्या वाशी तालुक्यातील म्हसोबाचीवाडी परिसरातील २२० केबी सबस्टेशन अंतर्गत काही कामे सुरू करण्यात आली होती. मात्र थकीत रक्कम न मिळाल्याने म्हसोबाचीवाडी, कडकनाथवाडी, तेरखेडा आणि वडजी या चार गावांतील शेतकरी एकत्र आले आहेत. अगोदर जुन्या थकबाकीची रक्कम द्या आणि त्यानंतरच कंपनीची कामे सुरू करा, अशी भूमिका घेत शेतकऱ्यांनी कंपनीची कामे बंद पाडण्याचा इशारा प्रशासनाला लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

वाशी तालुक्यात यापूर्वीदेखील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याच्या घटना घडल्या होत्या. आता पुन्हा विंड वर्ल्ड कंपनीविरोधात शेतकरी आक्रमक झाल्याने वाशी तालुक्यात संघर्ष तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

